**PUNE DISTRICT EDUCATION ASSOCIATION’S**

# SETH GOVIND RAGHUNATH SABLE COLLEGE OF PHARMACY,SASWAD

**कार्यक्रमाचे नाव**: दुर्गोत्सव २०२५

**तारीख**: १६/१०/२०२५

महाराष्ट्र शासनाच्या तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली आणि "अमृत" संस्थेच्या पुढाकारातून तसेच यूनेस्कोच्या सहकार्याने “दुर्गोत्सव” हा अभिनव उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमाचा मुख्य उद्देश म्हणजे छत्रपती शिवाजी महाराजांनी निर्माण केलेल्या दुर्गसंस्कृतीचे संवर्धन करणे, विद्यार्थ्यांमध्ये ऐतिहासिक जागरूकता निर्माण करणे आणि आपल्या सांस्कृतिक वारशाचा गौरव वाढविणे हा आहे. यूनेस्कोने छत्रपतींच्या बारा दुर्गांना जागतिक वारसा स्थळ म्हणून मान्यता दिल्यामुळे या उपक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

या उपक्रमांतर्गत राज्यातील सर्व शासकीय, अनुदानित व विनाअनुदानित पदवी व पदविका महाविद्यालयातील विद्यार्थी तसेच सामान्य नागरिक यांना आवाहन करण्यात आले की त्यांनी आपल्या परिसरात, घराच्या अंगणात किंवा सार्वजनिक ठिकाणी या १२ जागतिक वारसा दुर्गांपैकी कोणत्याही एका दुर्गाची प्रतिकृती बनवावी. रायगड, राजगड, प्रतापगड, सिंधुदुर्ग, साल्हेरदुर्ग, खांदेरी, जिंजी, पन्हाळगड, शिवनेरी, विजयदुर्ग, लोहगड आणि पद्मदुर्ग या दुर्गांच्या प्रतिकृती बनवून सहभागी होणाऱ्यांनी www.durgotsav.com या संकेतस्थळावर फोटो अपलोड करून नोंदणी करणे अपेक्षित होते. अपलोड केलेल्या छायाचित्रांची पडताळणी “अमृत” संस्थेमार्फत करण्यात आली आणि वैधता सिद्ध झाल्यानंतर प्रत्येक सहभागीला माननीय मुख्यमंत्री महोदयांच्या स्वाक्षरीचे डिजिटल अभिनंदनपत्र मिळाले.

**शेठ गोविंद रघुनाथ साबळे कॉलेज ऑफ फार्मसी, सासवड** या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी या उपक्रमात उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदविला. विविध शाखांतील विद्यार्थ्यांनी एकत्रितपणे गट तयार करून वेगवेगळ्या दुर्गांच्या प्रतिकृती अत्यंत कलात्मकतेने आणि कल्पकतेने साकारल्या. या उपक्रमादरम्यान विद्यार्थ्यांनी शिवचरित्रातील प्रेरणादायी प्रसंग जाणून घेतले तसेच संघभावना, सर्जनशीलता आणि देशभक्ती यांसारखी मूल्ये आत्मसात केली.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये इतिहासाविषयी अभिमान निर्माण झाला आणि आपल्या सांस्कृतिक वारशाचे जतन करण्याची प्रेरणा मिळाली. “दुर्गोत्सव” या उपक्रमाने समाजात एक सकारात्मक संदेश दिला हा उपक्रम प्राचार्या डॉ. राजश्री चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. एकूणच, **शेठ गोविंद रघुनाथ साबळे कॉलेज ऑफ फार्मसी, सासवड** येथे आयोजित “दुर्गोत्सव २०२५” हा उपक्रम शैक्षणिक, सांस्कृतिक आणि राष्ट्रप्रेम वाढविणारा ठरला असून भविष्यातही अशा उपक्रमांचे आयोजन सातत्याने करण्यात यावे, अशी भावना सर्वांच्या मनात निर्माण झाली.




**Dr.R.S.Chavan**
**Principal**

**Photo Gallery (16/10/2025)**











Principal

PRINCIPAL
PUNE DISTRICT EDUCATION ASSOCIATION'S
SETH GOVIND RAGHUNATH SABLE COLLEGE
OF PHARMACY, SASWAD, TAL. PURANDAR,
DIST. PUNE - 412301.

**Dr.R.S.Chavan**
**Principal**